

टकले जावळे बोडके

# नावात काय आहे?

दीडमिशे चावरे भोळे

कानखोजे डोळे कुरकुरे

■ प्रभाकर साठे

आपल्याकडे नुसत्या नावापेक्षा लोकांना आडनावाने ओळखण्याची प्रथा आहे. आता नावामागे 'आड' कशाकरीता लावतात याचा पूर्ण शोध मला लागला नसला तरी बहुतांशी नावाच्यामागे 'आड' का लावतात याचा थोडाबहुत सुगावा लागला आहे. वास्तविक 'आड' या शब्दाचा अर्थ किंवा संदर्भ चांगला नव्हे असा मला तरी संशय यायला लागला आहे. जसे आडमुठा, आडवळण, आडपडदा इत्यादी. म्हणूनच 'नावात काय आहे' की 'काय नावात आहे' याविषयी थोडा विचार करू लागल्यावर मला आता पटायला लागलंय की ज्यांनी कोणी मनुष्यमात्राची आडनावं पक्की केली असतील त्यांनी 'काया' (देह) नावात आहे या पार्श्वभूमीवरच आपलं नामकरणाचं संशोधन आधारित केलं असावं. अन्यथा इतकी विचित्र आडनावं कशी बरं सापडली असतील. पुढील कारणमीमांसेवरून सूज्ञ वाचकांचं मत माझ्यासारखंच होईल असं समजायला हरकत नसावी.

माझा एक केसकर नावाचा मित्र आहे. पण त्याच्या डोक्यावर केसांची फारच कमतरता आहे तर दुसऱ्याच्या डोक्यावर भरपूर जावळ असूनसुद्धा त्याचं नाव आहे 'टकले'. ते जर 'जावळे' असतं किंवा पहिल्याचं 'बोडके' असतं तर अधिक शोभून दिसलं नसतं का? शाळेत असताना माझ्या वर्गात इतकी मजेदार आडनावांची मुलं होती की काही विचारू नका. डोके, डोळे, कर्णे, कानखोजे, कानविंदे, दाते, हर्षे, दीडमिशे वगैरे. आता शाळकरी मुलाला दीड काय पण एक किंवा अर्धीसुद्धा मिशी असेल का? एका मुलाला जो दिसेल त्याला चावायची फार खोड होती. आता त्याचं नाव 'चावरे' होतं ते ठीक होतं. पण त्याच्याच बाकावरील गुंड-मवाली मुलाचं नाव 'भोळे' होतं. त्याच्यामागच्या विद्यार्थ्याचं नाव 'खानखोजे' का पडलं असावं याचा शोध मला काही दिवसांनंतर लागला. एकदा परीक्षा चालू असताना सहज त्याच्याकडे लक्ष गेलं. तेव्हा प्रश्न अवघड असल्यामुळे स्वारी नखं खात बसली होती. म्हणूनच खानखोजे पडलं असावं. (खा नखो जे) त्याचा शेजारी रडतराऊतच होता. तेव्हा त्याचं नाव 'कुरकुरे' पेक्षा वेगळं असणं शक्य नव्हतं. नाही म्हणजे नावात विसंगती तरी किती असावी? एका लख्ख गोऱ्या मुलीचं नाव 'काळे' तर जवळच्या आफ्रिकन-अमेरिकन मुलाचं नाव 'लखू गोरे'. आता घ्या आणि त्याच्याच पलीकडच्या कुरूप (दुर्दैवाने) मुलीचं नाव 'रूपा देखणे' म्हणजे कमालच झाली. आमचे मास्तर रोज फळ्यावर एखादं बोधवाक्य लिहायचे. 'खरे बोलावे, खोटे कधी बोलू नये.' त्यांना हे कशावरून सुचलं असावं बरं? आधार हाच असावा बहुतेक की खरे नावाचा मुलगा मख्खपणे तोंडाला कुलूप लावलेला असायचा तर खोटे नावाचा अखंड बडबड करायचा.

कॉलेजात असताना एकदा गंमतच झाली. ब्रिटिशांचा काळ होता तो! एका पारशी प्रोफेसरांना म्हणजे भंगारवालांना आपल्यात भारतीयपेक्षा विलायती रक्तच जास्त असल्याची समजूत असल्याने साध्या नावाचासुद्धा ते विपर्यास करीत असत. रोल कॉल घेताना एकाचं नाव त्यांनी 'धामधेरे' असं घेतलं. वर्गात एकच हशा पिकला. सहवेना म्हणून त्या विद्यार्थ्याने "एक्सक्युज मी सर, इट इज नॉट धामधेरे. बट ढमढेरे." मुलांना हसू आवरेना. तरी प्रोफेसरांनी "इज इट नॉट इक्वली बॅड?" म्हणून कोटी केली. आता ढमढेरे तरी काय करणार? एवढ्या चार अक्षरी नावापेक्षा नुसतंच 'ढेरे' असतं तर बरं झालं असतं असं त्याला वाटलं. त्याची मध्यकायाही तशी फुगीरच होती. आता 'कर' तर हात (कर) धुवूनच पाठीमागे लागल्यासारखे झालेत. ते कुठे, कसे, केव्हा आणि कोणाच्या मागे लागतील याचा काही नेमच नाही. पुणेकर, सातारकर, धारकर, खारकर, गडकर, फडकर, जुन्नरकर, सिन्नरकर, हर्डीकर, खर्डीकर आणि केळकर, आंबेकर वगैरे वगैरे.

(पान १२७ पहा)

ही उत्साही मंडळी सकाळ-संध्याकाळ अकराव्या डेकवरच्या जॉगिंग ट्रॅकचाही उपयोग करताना दिसायची. छोटे गोल्फपट आणि टेबलटेनिसची टेबलंही जातायेता मन रिझवायला उभी होती. छोटया आणि मोठ्यांमधली अर्धवट मुलं-मुली समवयस्कांबरोबर ओळखी करण्यात, व्हिडिओ आर्केडमध्ये नाहीतर डिस्कोथेकमध्ये रममाण होत होती तर गेमरूममध्ये बैठया मंडळींचे पत्ते, बुद्धिबळाचे डाव रंगत होते. बिंगो खेळायला दर दुपारी म्हाताऱ्या आजीआजोबांची Enchanted Evening लाऊंजमध्ये गर्दी व्हायची. आरामात बसून वाचता येण्यासाठी सुरेख पुस्तकसंग्रह असलेल्या लायब्ररीचीही सोय आहे. रसिक प्रवाशांसाठी आर्ट ऑक्शन, जहाज बल्लवाचार्यांची पदार्थांची प्रात्यक्षिके, याबरोबर शॉपिंग करायला छोटा मॉल आणि ब्युटी पार्लरसुद्धा हजर आहेत.

घराचं मॉर्गेज, पोरांचे अभ्यास, येणारी बिलं, जाणाऱ्या नोकऱ्या यांचा विचार बाजूला टाकून आल्या क्षणाचा वाइनच्या घुटक्यासारखा चवीने आस्वाद घेत, केवळ स्वत:ला वेळ देण्यासाठीही अनेकांनी सागरसफरीची निवड केली होती. जहाजातल्या एखाद्या शांत लाऊंजमध्ये कॉफीच्या सोबतीने पुस्तक वाचत पडणं, पूलमध्ये डुंबणं, पूलचेअरवर ऊन खात पडून गप्पा मारणं, ना कुठे जायची घाई, ना फोन खणखणणार, ना रोज चाळीस मैल गाडी चालवायची.

आलेल्या प्रवाशांमध्ये कित्येक मित्रमैत्रिणी, लांब लांब राहणारे नातेवाईक, कामावरचे ग्रुप एकत्र राहण्यातली मौज अनुभवायला आले होते. कॉफी पिताना भेटलेली जोॲन आणि तिची बहीण सहकुटुंब आले होते. सात दिवस स्वयंपाक नाही. (माझ्याशिवाय इतरही कोणाला त्याच्यात आनंद आहे हे बघून मला फारच बरं वाटलं.) आवराआवर नाही, मुलं आपापली खेळताहेत, बहीण, मेहुणा आणि नवऱ्याबरोबर भरपूर गप्पा मारता येताहेत यापेक्षा सुट्टी म्हणजे काय पाहिजे? हे तिचं म्हणणं मला अगदी पुरेपूर पटलं.

तिकीट काढल्यापासून सहासात महिने ज्याची आतुरतेने वाट पाहात होतो तो आठवडा झुळकेसारखा संपला. बारा वेळा क्रुजशिप्सवरून वेगवेगळया देशांत फिरून आलेले आणि पुढच्या क्रुजचं बुकिंग या जहाजावरूनच करून टाकणारे जॉन आणि क्लेअर, आम्ही भारतीय आहोत हे कळल्यावर आपल्या लखनौच्या प्रवासाच्या आठवणी सांगणारे जख्ख म्हातारे अमेरिकन आजोबा, सतीशला खास देशी स्टाइल आमलेट करून घालणारा गोव्याचा शेफ, हसतमुखाने स्वागत करणारे एरिका, ब्रॅड, डॅनी, मल्हारची ओशन ॲडव्हेंचर क्लबमधील मित्रमंडळी यांच्या आठवणी आणि झालेल्या नव्या ओळखींची या सफरीवर पुंजी गवसलीच. पण 'लहेरोंकी मस्तीमें' केलेला गेल्या दहा वर्षांचा हिशोब आम्हाला आमचीही नव्याने ओळख करून देऊ गेला.

■

**वर्षा पेंडसे,**
**फ्रिमाँट, कॅलिफोर्निया**

## नावात काय आहे? (पान १२१ वरून...)

पण ही नाव म्हणजे 'आडनावं' का व कशी पडतात याचा कितीही खोल विचार केला तरी त्याचं उत्तर मला अजून सापडलं नाहीय. उदाहरणार्थ हीच नावे पहा. गुपचूप, बोलघेवडे, बहिरट, कर्णे, माने, पोटे (पोटावरून की पोटरीवरून?), दाढे, बोडके, मातोंडकर, दंडवते, भुजबळ, एकबोटे, बारहाते, अळणी, अळवणी, दुतोंडे, तोंडवळकर, कोठेकर, कोठावळे, जांधे, गंधे, सुगंधी, पटवर्धन, कदम, वारे, घारे, उजवे, डावरे, बिनीवाले, पुँछवाले, मूतनाळे, धारकर, धडफळे, तळपदे, मनसबदार, पाचपुते, सातपुते, अष्टपुत्रे... म्हणजे आता हे कुठपर्यंत जाणार? ज्या कोणी अशा नावांची प्रथा पाडली असेल त्यांची स्वत:ची नावे मात्र 'विचारे', 'सहस्त्रबुद्धे' ही नसली तर गोंधळेकरच असणार यात शंका नाही.

तात्पर्य, 'काय नावात आहे' हेच खरं. जर कोणी स्वत:ला फारच हुशार समजत असेल तर त्याने कायेतील आतापर्यंत न वापरलेल्या अवयवांवर आधारित नवी नावे किंवा आडनावे शोधण्याच्या खटाटोपात पडू नये. पडलाच तर निदान तशा नावांना प्रसिद्धी तरी देऊ नये ही विनंती. (होनावर, उद्यावरकर किंवा बारलिंगे, घरबुडवे अशा आडनावांची उत्पत्ती या लिखाणाच्या आवाक्याबाहेरची आहे.)

■ **प्रभाकर साठे**